IMPACT FACTOR 5.473 (SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed E-Journal
ISSN 2455-4375

# आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेतील सामाजिक आशय

**प्रा. प्रमोद नारायणे**
सहयोगी प्राध्यापक
यशवंत महाविद्यालय, वर्धा
९८५०३०९६६५
narayanepm123@gmail.com

**प्रस्तावना :—**

१९६० नंतर मराठी साहित्यात विविध साहित्यप्रवाहांना सुरूवात झाली. यात आंबेडकरवादी साहित्याचा प्रवाह अत्यंत महत्त्वाचा आणि लक्षणीय ठरला. साहित्यमूल्ये आणि जीवनमूल्ये या दृष्टीकोनातून आंबेडकरवादी साहित्यप्रवाहाने भारतीय पटलावरच नव्हे, तर जागतिक पातळीवर नव्या विचारदृष्टीला सुरूवात झाली. या साहित्यप्रवाहाने दुर्लक्षित असे अनेक लेखक जन्माला घातले. आणि त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण असे नवे भावविश्व आणि वेगळे असे वास्तवविश्व प्रत्ययाला येऊ लागले. अनेकानेक लेखकांनी आपल्या जीवनजाणिवा साहित्याच्या माध्यमातून लेखनबद्ध केल्या. यात पुरूष लेखकांचे प्रमाण विपुल असले तरी आंबेडकरवादी साहित्याचा प्रवाह अधिक संपन्न करण्यासाठी स्त्री लेखिकांनी फार मोठी भर घातली. आंबेडकरवादी स्त्री लेखिकांनी कथा कादंबऱ्यांमधून आपल्या जीवनजाणिवा प्रकर्षाने मांडल्या. त्याचबरोबर त्यांनी कवितेच्या माध्यमातून आपल्या भवतालचा सामाजिक आलेख जोरकसपणे मांडला. मराठी साहित्याच्या दृष्टीने या कविता अधिक लक्षवेधी आणि महत्त्वपूर्ण ठरल्या. या कविता विविधांगी स्वरूप आणि वैशिष्ट्यासह अवतीर्ण झाल्या. एवढेच नव्हे तर या कवितेने आशय आणि अभिव्यक्तीच्या बाबतीत आपल्या वेगळेपणाचा ठसा उमटविला. या निबंधाच्या माध्यमातून आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेतील सामाजिक आशय कशाप्रकारे व्यक्त झाला आहे हे सांगण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

**आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेतील सामाजिक आशय :—**

आंबेडकरवादाचे शस्त्र घेऊन काव्यलेखन करणाऱ्या कवयित्रींचे लौकिक व्यक्तिमत्त्व समजून घेतल्यास तिच्या कवितेतील सामाजिक आशय अधिक स्पष्ट होण्यास मदत होऊ शकेल, या कवयित्रींपैकी काही कवयित्री ग्रामीण भागातील आहेत. काही कवयित्री काही काळ ग्रामीण भागात राहून आज शहरी भागात स्थायिक झाल्या आहेत. काही कवयित्री मूळातच शहरी भागातील आहेत. काही कवयित्री शहरी भागातील कनिष्ठ मध्यमवर्गीय कुटुंबातील आहेत. तर काही सामान्य व साधारण आर्थिक परिस्थितीतून आलेल्या आहेत. काही कवयित्री झोपडपट्टी भागातील आहेत. तर काही शहरातील दुर्लक्षित वस्त्यांमधील आहेत. काही अल्पशिक्षित आहेत, तर काही उच्चशिक्षित आहेत. यातील काही कवयित्री अध्यापिका आहेत, तर काही प्राध्यापिका आहेत. काही डॉक्टर आहेत तर काही इंजिनियर, काही मजूरही आहेत तर काही कामगार, काही गृहिणी आहेत, तर काही कामकरी, असे असले तरी ह्या सर्वच कवयित्रींमध्ये काही बाबतीत समान धागा आहे. आणि तो म्हणजे ह्या सर्वच कवयित्री विविध चळवळीमध्ये कार्य करणाऱ्या आणि सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्या कार्यकर्त्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर आणि तत्त्वज्ञानावर ह्या सर्वांच्याच निष्ठा आहेत. या सर्वच जणी त्यांच्या पूर्वायुष्यात आणि वर्तमान जीवनात प्रखर अशा सामाजिक वास्तवाच्या बळी ठरलेल्या आहेत. या सर्वच कवयित्रींकडे निखळ आणि स्पष्ट अशी

काव्यविषयक भूमिका आहे. या .समान अशा व्यक्तित्वामुळे आणि कवित्वामुळे त्यांच्या कवितेतून जाणवणारा सामाजिक आशय अनेक बाबतीत समानधर्मी असणे स्वाभाविकच आहे.

आंबेडकरवादी कवयित्री तिच्या प्रतिभासामर्थ्याने आणि चिंतनशीलतेने या एकूणच जगाकडे पाहते. या जगाचे आणि मुख्यत्वेकरून आपल्या देशाचे सामाजिक वास्तव किती भयावह आहे हे तिच्या नजरेस पडते. हे अस्वस्थ करणारे वास्तव पाहण्यासाठी तिला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचारदृष्टी लाभलेली आहे. त्यामुळे इतर मराठीतील कवयित्रीपेक्षा येथील सामाजिक वास्तवाकडे तिला वेगळ्या पद्धतीने पाहता येते, दुसरी गोष्ट म्हणजे स्त्री जीवनाच्या वाट्याला आलेले दु:खभोग तिच्याही वाट्याला आले आहेत. 'जीस तन लागे, वही तन जाने, दुजा क्या जाने गवारा रे' या उक्तीप्रमाणे ती स्वत:च या दु:खाची वाटेकरी आहे. त्यामुळे हे सामाजिक वास्तव पाहताना तिची होणारी तळमळ, सतत तिला जाणवणारी तगमग, आणि या यातनामय जगण्याविरूद्ध तिच्या मनात निर्माण झालेली विद्रोहाची धगधग तिच्या कवितांमधून दिसून येते.

आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितांमधील सामाजिक आशयाचा विचार करताना सर्वच आंबेडकरवादी कवयित्रींचा नामोल्लेख करणे शक्य नसले तरी, येथे काही कवयित्रींची नामावली वाचणे आणि त्यांच्या कवितांमधील सामाजिक जाणिवा समजून घेणे क्रमप्राप्त ठरते. यात ज्योती लांजेवार, हिरा बनसोडे, मल्लिका अमरशेख, कुमूद पावडे, लिला पाटील, प्रतिभा राजानंद, सुगंधा शेंडे, सुरेखा भगत, प्रज्ञा लोखंडे, सिसिलीया कार्व्हालो, निर्मला लोंढे, प्रतिभा अहिरे, माया वासनिक, उषा हिंगोणेकर, आशालता कांबळे, सरला ठमके, उषाकिरण आत्राम, कुसुम अलाम, उल्हासिनी कांबळे, सरिता जांभुळे, संध्या रंगारी, मीना गजभिये, उषा भालेराव, धम्मज्योती कांबळे, आशा थोरात, उषा साळवे, उषा अंभोरे, निलांबरी शिर्के, धम्मज्योती शेगोकार कांबळे, ज्योत्स्ना चांदगुडे, प्रज्ञा बडोले इत्यादी कवयित्रींच्या कवितांमधून भूकेचे असह्य प्रश्न, जातीय आणि धार्मिक विषमता, स्त्रियांना भोगवस्तू मानणारे बाजारीकरण, अन्यायाविरूद्ध दाद मागणाऱ्या न्यायव्यवस्थेला बटिक करणारी अन्यायव्यवस्था, अत्याचारी पाशवी आणि हिंस्त्र नजरा, इथली पारंपरिक विवाहसंस्था आणि कुटुंबव्यवस्था, स्त्रिशूद्रादिशूद्रांना ज्ञानबंदी लादणारी शिक्षणव्यवस्था, स्त्रिला दुयमत्व देणारी पुरू  ासत्ताकता, परंपरावाद्यांच्या सुरक्षाकवचांमुळे टिकून राहिलेली सनातनी धर्मव्यवस्था, लिंगभेदातून विषमता मानणारी समाजव्यवस्था, स्त्रियांच्याच वाट्याला आलेली निर्घृण सतीप्रथा, समाजातील अनिष्ट चालीरिती, स्त्रियांचा बळी घेणारी निर्दयी अंधश्रद्धा इत्यादी सामाजिक विषयांसह त्यांच्या कवितेचा आशय प्रकट होताना दिसतो.

आंबेडकरवादी कवयित्रीला प्रखर असे सामाजिक भान लाभले आहे. त्यामुळे समाजातल्या प्रत्येक स्त्रियांच्या दु:खाशी आणि वेदनेशी ती समरूप होते. स्त्रियांच्या वाट्याला आलेली दु:खे ही व्यक्तिगत स्वरूपाची वाटत असली तरी ती सामाजिक स्वरूपाची आहेत हे तिच्या लक्षात येते. ''स्त्रीचे शोषण करणाऱ्या समाजरचनेचे, तिच्या मूल्यसरणीचे स्वरूप काय आहे? धार्मिक सामाजिक, आर्थिक आणि लैंगिक असे सर्व पातळ्यांवर स्त्रीचे शोषण करणारी समाजरचना समजावून घ्यायला हवी. स्त्रीला तिच्या गुलामीचा गौरव आणि दुय्यमत्त्वाला सन्मान मानायला शिकविणारी ही समाजरचना एखाद्या अवघड कोंड्यासारखी आहे.''[१] येथील व्यवस्थेने काही नितीनियम तयार करून ठेवले. या कारणानेच स्त्रियांच्या वेदनेचे मूळ इथल्या समाजव्यवस्थेत, धार्मिक व्यवस्थेत आणि इथल्या सरंजामी व्यवस्थेत दडलेले आहे हे तिच्या नजरेतून सुटत नाही. त्यामुळेच आंबेडकरवादी कवयित्रींची कविता दु:खांना गोंजारत बसत नाही किंवा वेदनांचे

भांडवलही करीत नाही. त्याउलट त्यांच्या उपेक्षित जीवनाला कारणीभूत असलेल्या व्यवस्थेवर प्रतिहल्ला करायला ती घाबरत नाही.

आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेमधून व्यक्त होणारा सामाजिक आशय हा स्त्रीला माणूस म्हणून उभा करण्याच्या धडपडीतून आलेला आहे. माणसाच्या देशात माणूसच पशूप्रमाणे वागू लागल्याचे शल्य ज्योती लांजेवार या कवयित्रीला आहे. हिंस्त्र प्राण्यांना माणसाळणे सोपे झाले आहे, पण माणसाला माणूसपणात आणणे कठीण होऊन बसले आहे. यातूनच स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांची संख्या वाढत चालली असल्याची खंत त्यांच्या कवितेतून व्यक्त झाली आहे. काळोखाला मित्र करणाऱ्या पुरूषी अत्याचारातून मुक्तता मिळावी आणि त्यांचे सारे सोहळे मोडीत काढावे असे केवळ वाटून उपयोगाचे नाही किंवा एकमेकांच्या समाधानासाठी आतल्या आत हमसून रडून उपयोगाचे नाही असे सुरेखा भगत या कवयित्रीला वाटते. म्हणूनच ती सर्वच अत्याचारग्रस्त स्त्रियांना अत्याचाराचा प्रतिकार करण्याचे आवाहन करते,

''काळोखाचे मित्र व्हा
सारीकडून हाका ऐकू येत आहेत
अशावेळी निश्चिंतपणे पहडून राहू नका
भोवती वेढा पडण्याच्या आत
त्यांचा दोर कापण्यासाठी सज्ज व्हा''[२]

अशी हाक सर्वच स्त्रीयांना ती देते. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेने काळोखाच्या विळख्यात सापडण्यापेक्षा काळोखावर प्रतिआक्रमण करण्याची भूमिका घेतलेली दिसून येते.

ज्या देशात पताका तोरणाने गुढी सजविली जाते. त्या देशात स्त्रीला बहिष्कृत म्हणून वागविले जाते. त्या देशात स्त्री अजून गुलाम आहे. तिचे बोलके स्वप्न संस्कृतीच्या नावाखाली पायदळी तुडविले जातात. तिच्या प्रगतीच्या उडत्या पंखांना छाटले जाते. याची खंत आंबेडकरवादी कवयित्रींना वाटते. हिंरा बनसोडे या आघाडीच्या आंबेडकरवादी कवयित्रींनीने या देशातील सामाजिक व्यवस्थेच्या विरोधात फिर्याद मांडलेली आहे.

''ही माझी फिर्याद
आमच्या कर्मठ संस्कृतीवर आहे,
जिने आम्हाला बंद कोठडीत कैद केले आहे,
जिथे आम्हाला बहिष्कृत आयुष्याचे दान आहे,
जिथला वारा आम्हाला परक्यासारखा वागवितो
...जिथला पाऊस आम्हाला फक्त दुष्काळच देतो,
जिथले पाणी आमच्याशी मृगजळाचा जीवघेणा खेळ खेळते''[३]

यासाठी हिरा बनसोडे यांची फिर्याद आहे. ही आंबेडकरवादी कवयित्रींची फिर्याद या संस्कृतीचे संस्कृतीरक्षक म्हणवून घेणारे समाजकंटक ऐकत नाही तेव्हा त्या विद्रोहाची आणि युद्धाची भाषा बोलू लागतात.

''क्रांतीची बिजली पेरली आहे
प्रत्येक घायाळ ह्रदयात
ही लढाई अटळ आहे....अटळ आहे.[४]

अन्यायाच्या विरोधात पेटून उठण्यासाठी त्या सज्ज होऊ पाहतात. हा अन्याय माणुसकीच्या न्यायालयासमोर त्यांना न्यायचा आहे. इथे तरी त्यांना न्याय मिळेल अशी अपेक्षा आहे. म्हणूनच

''लोकहो, तुमच्या न्यायालयात मी फिर्याद आणली आहे.
तुम्ही तरी मला न्याय द्याल का?
माझ्या अंगाअंगावर झिरपतात अपमानाच्या खोल जखमा,
आमची इज्जत लुटली जात आहे,
जातीयतेच्या धर्मांध व्यासपीठावर,
आमचे शील जळत आहे धर्मग्रंथांच्या पानापानावर....
हा पराजित इतिहास बदलण्यासाठी आव्हान देणारे बलदंड हात
तुम्ही तरी द्याल का... ''[५]

असे आकांतवजा आवाहन ती करते.

या देशातील स्त्रियांवर लादल्या गेलेल्या दास्यत्वाच्या शृंखलांमुळे या देशात स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी व्यवस्था कधीच नव्हती असे प्रतिभा अहिरे यांना वाटते.

''सूर्याचे दरवाजे आमच्यासाठी उघडे टाकण्याची प्रथा
केव्हाही नव्हती माझ्या देशात
पाखरांच्या पायात बेड्या न घालण्याची प्रथा
केव्हाही नव्हती माझ्या देशात''[६]

असे प्रतिभा अहिरे यांना वाटते. या देशात जेव्हा जेव्हा विषमतावादी व्यवस्था निर्माण झाली. त्या व्यवस्थेबद्दल त्यांना बोलायचे आहे हे लक्षात आल्यावाचून राहत नाही.

तथागत गौतम बुद्ध, जोतिराव फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रमाई, हे सर्वच आंबेडकरी चळवळीचे स्फूर्तीदाते आहेत. त्यांच्या विचार आणि कार्याने आंबेडकरवादी सामाजिक आंदोलनाला शक्ती मिळाली आहे. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितांमधून या सर्वच स्फूर्तीनायकांचे गुणगाण गायिले आहे. जोतिराव फुलेंनी स्त्री उद्धारांचे पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी सावित्रीबाई फुलेंची मदत लाभली. टोकाच्या विरोधाचा प्रतिकार करीत सावित्रीबाई फुले समाजउद्धाराचे कार्य करीत राहिल्या. अनेक हालअपेष्टांमधून त्यांना या सामाजिक कार्याला गती द्यावी लागली. पण त्यांनी हार मानली नाही. सावित्रीबाई फुलेंचे हेच कार्य पुढे सुरू ठेवण्यासाठी आम्ही लढत राहू अशी प्रतिज्ञाच आंबेडकरवादी कवयित्रींनी केली आहे. निलांबरी शिर्के यांच्या मशाल या कवितेत ''स्त्री जातीच्या उद्धारास्तव ज्योत अशीच तेवत ठेवू, काळ बदलला आम्हीही बदलू, ज्योत नव्हे आम्ही मशाल होऊ''[७] अशाप्रकारची प्रतिकाराची जाणीव आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेतून निर्माण झालेली आहे.

जोतिराव फुले यांनी विद्येविना मती गेली सांगत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाज परिवर्तनासाठी शिक्षणाला महत्त्वाचे साधन मानले. आधुनिक काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडविलेल्या पहिल्या पिढीने या शिक्षणाचे महत्त्व ओळखले. गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी शिक्षणासारखे शस्त्र आवश्यक आहे हे त्यांनी जाणले आणि आपल्या पिढीला याचे महत्त्व त्यांनी समजावून सांगितले. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेतील सामाजिक जाणीव या शिक्षणविषयक विचारातून व्यक्त झाली आहे. प्रज्ञा बडोले यांच्या 'महा बाप सांगे मले' ही कविता या दृष्टीने महत्त्वाची आहे,

''महा बाप सांगे मले
पळसाले पानं तीन
नको राहूस अडाणी
कर जीवनाचं सोनं

महा बाप सांगे मले
पोरी शिकून हो मोठी
सार अंधाराले दूर
बांध ज्ञानाची गाठोडी

बापाला शिक्षणाचे महत्त्व पटल्यामुळेच

माह्या शिक्षणाच्या पायी
बाप शिणला झिजला
त्याने सोताच्या सुखाला
उभा सुरुंग लावला''८

ज्या काल्पनिक अशा ईश्वर संकल्पनेनी सामाजिक विषमतेची मूळे या देशाच्या संस्कृतीत पेरली. त्याला नकार देणे हे आंबेडकरवादी कवितेचा मूलाधार राहिला आहे. केशव मेश्राम, यशवंत मनोहर, वामन निंबाळकर, इत्यादी कवींनी आपल्या कवितांमधून देव या संकल्पनेवर थेट हल्ला केला आहे. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेमधून देव ही संकल्पना नाकारली गेली आहे. अलिकडच्या काळातील कवयित्री संध्या रंगारी यांच्या कवितांमधून त्याचा प्रत्यय येताना दिसतो.

''मी मायला इचारलं
माय,
तू देवळात कधीच जात न्हाईस
तव्हा माय मनली
पोरी,
त्या दगडाच्या देवाम्होरं
सारं आयुष्य वाहिलं
तरीबी त्याले पाझर फुटत न्हाई
त्यापरीस माझं जातं बरं
ते कधीच चार दाण्याशी बेईमान होत न्हाई''९

आंबेडकरवादी कविता विज्ञानवाद मानणारी आहे. ही कविता कार्यकारणभावाने प्रत्येक गोष्ट तपासून पाहते. तिला चिकित्सक दृष्टी लाभली आहे. त्यामुळे इथल्या सामाजिक वास्तवाकडे पाहताना ती ताठ उभी राहून प्रत्येक गोष्टीचा योग्य अर्थ लावते.

आंबेडकरवादी कवयित्रींनी त्यांच्या सामाजिक जाणिवा व्यक्त करताना मिथकांचा वापर केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरकरांनी रिडल्स ऑफ राम ॲन्ड कृष्ण या ग्रंथात रामकृष्णाच्या लौकिक व्यक्तिमत्त्वाची साधार चिकित्सा केली आहे. शंभुक या मिथकाचा वापर आजचे सामाजिक वास्तव आणि आजच्या शंबुकावर होणाऱ्या अन्यायाच्या बाबतीत कवयित्रींनी दाखविले आहे. प्रज्ञा लोखंडे म्हणते

''ते आता अधिकच सावध झालेत
वारा कसा निपचित होऊन
कानोसा घेतोय
आभाळही फितूर झालाय
वेशीबाहेरच्या अनवाणी पायांशी
दिशांवर चढलेली अमानुष काजळी
अजून तशीच आहे शंबुका
रामराज्यात होती तशीच.... ''१०

आंबेडकरवादी कवयित्रींची कविता परंपरेविरूद्ध पुकारलेल्या युद्धाची कविता आहे. या कवितेनी इथल्या पारंपरिक अशा विषमतावादी मूल्यांना पूर्णपणे नाकारले आहे. स्त्रियांना गुलाम करणाऱ्या व्यवस्थेविरूद्ध त्यांच्या कवितेतील शब्द हल्ला करतात. तर त्याचवेळी ती विवेकी आणि विज्ञाननिष्ठ विचारांच्या स्वीकाराची कविता झाली आहे. या विवेकनिष्ठ विचारदृष्टी लाभलेल्या त्यांच्या लेखनीला परंपरेनी चालविलेला मानवद्रोह दिसतो. या मानवद्रोहाच्या विरूद्ध बंड करून उठणारी ही कविता आहे.

आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितांच्या सामाजिक आशयाचे स्वरूप विविधांगी आहे. हा सामाजिक आशय तिच्या स्त्री म्हणून समूहवाची जगण्याचा विषय आहे. याचबरोबर इतर स्त्रियांच्या वाट्याला न आलेली जीवनाची चित्तरकथा तिच्या वाट्याला आली आहे. तिही स्वतंत्रपणे तिच्या कवितांमधून प्रकट होताना दिसते. दलित स्त्री ग्रामीण भागात मजूर म्हणून काम करते. ग्रामजीवनातील रितीरिवाज, धार्मिक परंपरांच्या जोखडात ती सुद्धा बांधली गेली होती. अशावेळी स्त्री म्हणून तिचे सामाजिक विश्व वेगळे होते. आंबेडकरवादी कवयित्रींनी ग्रामीण भागातील स्त्रियांचे सामाजिक वास्तव आपल्या कवितेतून चितारले आहे.

महानगरीय जीवनात तिच्या वाट्याला आलेले दु:खभोग वेगळ्या स्वरूपाचे आहे. तिची जगण्याची धडपड, शहरी संस्कृतीशी समरूप होताना तिची होत असलेली दमछाक, शोषणाचे अनेकानेक पदर, पोटाची खळगी भरताना कुटुंबाची होत असलेली वाताहत, झोपडपट्टीत जगताना होणारा जीवनाचा कोंडमारा, नशासक्त भवताल, रोज चाललेला जीवनकलह या सर्वच गुंत्यात ही स्त्री अडकलेली आहे. हे मन विदीर्ण करणारे सामाजिक वास्तव आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितांमध्ये आशयबद्ध होताना दिसतात.

सामाजिक आशयाच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास ब्लॅक लिटरेचरमध्ये आढळणारा आणि ब्लॅक कवयित्रींच्या कवितांमधून व्यक्त होणारा आशय आणि आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितांमधून व्यक्त होणारा आशय यामध्ये बऱ्याच बाबतीत साम्य दिसून येते. अमेरिकन निग्राईड स्त्रियांचे जीवन असह्य अशा गुलामगिरीच्या जोखडात गेलेले आहे. ''स्त्रीविषयक जाणीव ब्लॅक पोएट्री आणि आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितांमधून दिसून येते. अमेरिकन ब्लॅक स्त्री असो की भारतीय दलित स्त्री असो तिचे शोषण केले गेलेले आहे यांचा संताप दोन्ही कवितांमधून व्यक्त झालेला आहे. अमेरिकन पुरू षांचा ब्लॅक स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन या विषयाचे उत्कट चिंतन ब्लॅक पोएट्रीमध्ये विशेषत्त्वाने दिसून येतो. ब्लॅक स्त्रीच्या शौर्याचा अभिमानही या कवितेतून आविष्कृत झालेला आहे. हाकी मधुबुटी यांच्या My Brothers या कवितेत हा आविष्कार आला आहे.

''आपण होतो युद्धावर आणि
वादळातील सैल वाळूकणाप्रमाणे

होत होती हकालपट्टी काळ्यांची
अमेरिकन भूमीतून
आणि काळी स्त्री झुंजत होती त्यांच्याशी
आपल्यापेक्षा तिपटीने
असा ब्लॅक स्त्रीचा गौरव केला गेला आहे.'' ११

आंबेडकरवादी कवयित्रीनेही इथल्या व्यवस्थेविरूद्ध युद्ध पुकारले आहे. या युद्धात सहभागी झालेल्या महानायिकांचा तिने गौरव केला आहे. हा गौरव करताना या कवयित्रींच्या सामाजिक युद्धाचे वर्णन आलेले आहे. उषा हिंगोणेकर यांच्या शस्त्र या कवितेमधून हा आशय व्यक्त होताना दिसतो.

''शस्त्र हाती घेतले
तेव्हा.......
सागराला आली भरती
आकाश थरथरले
थरथरली धरती
या शस्त्राने
करेन शिरच्छेद त्यांचा
ज्याने केल्या रक्तांच्या जाती
जातींच्या उभारल्या भिंती''[१२]

ही जातीय भिंती जमिनदोस्त करण्यासाठी सज्ज झालेली स्त्री आणि तिचे वर्णन आंबेडकरवादी कवयित्रींनी केले आहे. ही शस्त्रसज्जता आशयातील बंडखोर आणि युद्धखोर वृत्ती व्यक्त करताना दिसते. धम्मज्योती कांबळे यांची ''तुझ्या शब्दात...अन्यायाची भाषा दिसून येते, तुला माहीत नाही का? अन्यायातून संघर्षाची ज्योती पेट घेते !''[१३] अशाप्रकारे आंबेडकरवादी कवयित्री सामाजिक भेदाभेदांच्या विरोधात संघर्षाच्या दिशेने निघाली आहे याची साक्ष देणाऱ्या या ओळी आहेत

ब्लॅक पोएट्रीत अनेक स्त्रीविषयक कवितांमधून ब्लॅक स्त्रियांच्या गौरवाबरोबरच श्वेत स्त्रियांविषयी घृणास्पद भावनाही व्यक्त झालेल्या आहेत. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेतून व्यक्त होणारी स्त्री जाणीव ही अधिक व्यापक आहे. अन्यधर्मिय स्त्रियांच्याही वेदनेला ही कविता मुखर करते. प्रज्ञा लोखंडे यांची कविता पाहता येईल.

''तशी तू मुक्तच आहेस अमिना
एक जाळीदार झरोका
बांधलाय ना तुझ्या डोळ्यांवर ?''

किंवा

''स्त्रीत्वाचा मूक आक्रोश सजवण्यातच
धन्य झालेली आपली महान संस्कृती आणि
जोहारापासून सतीपर्यंत हा प्रवास
इक्कीसवी सदीत तसूभरही बदलला नाही, रूपकंवर''[१३]

आंबेडकरवादी कविता ही केवळ दलित स्त्रीयांचीच वेदना व्यक्त करते असे नाही, एकूणच भारतीय समाजातली स्त्री सामाजिक गुलामच मानली गेली आहे. विविध जातीधर्मातील स्त्रियांचे दु:ख आंबेडकरवादी कवितेने अत्यंत प्रभावीपणे व्यक्त केले. प्रज्ञा लोखंडे यांच्या अमिना आणि रूपकंवर या कवितेतून त्याचा प्रत्यय जसा येतो तसाच 'अनवट आणि बाई' या कवितेतूनही हा व्यापक सामाजिक आशय स्पष्ट होताना दिसतो

सिसिलीया कार्व्हालो या कवयित्रींने सतीच्या चालीचे दृश्यरूप चितारले आहे. तर सुगंधा शेंडे यांनी तर 'बहिणी बहिणी' या कवितेतून

"असू उत्तरच्या वा दक्षिणच्या
पूर्वी व पश्चिमी
भारत आपुला आम्ही भारतीय
अवघ्या बहिणी बहिणी"१४

अशाप्रकारची सर्वधर्मीय आणि सर्वजातीय एकीची भूमिका घेतलेली आहे.

आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेने मराठी साहित्यात वाङ्मयनिर्मितीचे स्वतंत्र असे दालन सुरू केले आहे. त्यांच्या कवितेतील सामाजिक आशयाला प्रौढता आणि प्रगल्भता आहे. आशयाचे अनेकानेक वलये आणि कांगोरे त्यांच्या कवितेला लाभले आहेत. आंबेडकरवादी कवयित्रांची कविता सामाजिक आशयाच्या दृष्टीकोनातून सर्वस्पर्शी आणि विविधांगी झाली आहे. त्यांच्या कवितेनी स्त्रीजीवनासमोर उभी ठाकलेली आव्हाने आपल्या कवितेतून मांडले आहेत. त्याचबरोबर मानवी जीवनासमोर निर्माण झालेल्या अनेक अरिष्टांची लक्तरे आपल्या शब्दसामर्थ्याने वेशीवर टांगण्याचे काम त्यांनी केले आहे. आंबेडकरवादी कवयित्रींची कविता महिलांच्या विविध प्रश्नांना जगासमोर आणू इच्छिते, आणि त्या प्रश्नांची उकल करत नव्या आशावादाच्या जवळ जात स्त्री जीवनाची नवी पहाट उगविण्याची स्वप्ने मनात बाळगते. या कवितेला अन्याय मान्य नाही, या कवितेला अत्याचाराचा पाषाणी प्रहार मान्य नाही, ही कविता अज्ञानाच्या गर्गेत राहू इच्छित नाही. ही कविता अंधश्रद्धांच्या बाहूपाशात अडकून कोणाची साथसंगत करायला तयार नाही. ही कविता स्थिरतावादाच्या सोबतीने प्रवास करायला कधीही तयार नाही. या कवितेला जगाच्या उत्पत्तीची प्रचलित असलेली कारणे मान्य नाहीत. जगाच्या निर्मितीसाठी देवाला पुढे करणाऱ्या येथील ईश्वरवादी संस्कृतीचा ही कविता धिक्कार करते. या कवितेला अंधाराच्या वाटेचे वाटसरू होणे कधीही मान्य नाही. या कवितेने गुलामगिरीचा पुरस्कार करणाऱ्या पुरस्कर्त्यांवर प्रतिहल्ला चढविला आहे. या कवितेला उतरंडीची समाजव्यवस्था मान्य नाही. ही कविता धर्माच्या नावावर स्त्रीयांच्या शोषणाचे कित्ते गिरविणाऱ्या धर्ममार्तंडांवर आणि पुरोहितशाहीवर तुटून पडते. विविध व्यवसायात वावरणाऱ्या स्त्रीजीवनाला असह्य वेदना देणाऱ्या पुरूषी अहंकाराला ही कविता धिक्कारून टाकते. उदासिनता, निराशावाद, खचलेपणा, विफलतावाद, मिंधेपणा, दलालखोरी, दगाबाजी, फितुरी या गोष्टीच्या ही कविता आहारी जात नाही. या सृष्टीच्या कोणत्याच घटकांवर अन्याय व्हावा हे तिला मान्य नाही.

आंबेडकरवादी कवयित्रींची कविता ही समाजातील सर्वच प्रकारचे भेदभाव नष्ट करून समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीला प्राधान्य देते. तिला मानवी कल्याणाचा ध्यास लागलेला आहे. माणूस म्हणून धर्म, पंथ, प्रांत, लिंग या कुठल्याच बाबतीत कोणीही वंचित राहू नये असे या कवितेला वाटते. ही कविता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या सामाजिक उत्थानाच्या तत्त्वांना प्रमाण मानते. ही कविता समता,

स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय या संविधानमूल्यांचा प्रचार आणि प्रसार करू इच्छिते, या कवितेचा मूलाधार ही परिवर्तनमूल्यांची जोपासना करणे असा आहे त्यामुळे या कवितेला प्रवाही राहणे आवडते. ही कविता विश्वकल्याणासाठी आसुसलेली आहे. प्रकाशाच्या प्रज्ज्वलित अशा वाटेने जाण्याची आणि या सर्वच मानव जातीला या वाटेने नेण्याचा ध्यास या कवितेने घेतलेला आहे. ही कविता सर्वच दृष्टीने सर्वांग सुंदर होऊ इच्छिते, तिला मानवाच्या जीवनात नव्या सौंदर्यशास्त्राचे धडे गिरवायचे आहे. या कवितेला आशावादाच्या अफाट समुद्रात प्रवास करीत किनारा गाठायचा आहे. या कवितेला सौंदर्यपूर्ण शब्दाला आपल्या बाहूपाशात अडकवून मिरवायला आवडत नसून शब्दांच्या धारदार शस्त्रांनी विषम व्यवस्थेचे निर्दयी पाश बेमूर्वतपणे फेकायचे आहेत. तिच्या अनुभवविश्वाला विविधांगी आयाम आहेत. हा सर्वच आशयपट एका निबंधांत सामावून घेणे शक्य नाही.

**निष्कर्ष :—**

१. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेतील आशयाला वैश्विक असे परिमाण लाभले आहे.
२. आंबेडकरवादी कवयित्रींची कविता सामाजिक आशयाच्या दृष्टीने परिपूर्ण अशा आहेत.
३. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कविता नव्या सामाजिक आशयासह व अभिव्यक्तीसह प्रकट झाली आहे.
४. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेने समग्र स्त्रीजीवनाच्या भावविश्वाबरोबरच वेगळे असे नवे भावविश्व लेखनबद्ध केले आहे.

**समारोप :—**

आंबेडकरवादी कवयित्रीच्या कवितेतील सामाजिक आशय विविधांगी स्वरूपाचा आहे. या कवितेनी सर्वच सामाजिक जाणिवांना आपल्या कक्षेत घेतले आहे. या कवितांचा आशयविस्तार प्रदीर्घ स्वरूपाचा आहे. दलित, वचिंत, उपेक्षित स्त्रियांच्या जीवनजाणिवा व्यक्त करतान या कवितेनी संपूर्ण मानवजातीचे दु:ख व्यक्त करीत या वेदनामय जीवनासाठी कारणीभूत असलेल्या सर्वच कारणांची चिकित्सा केली आहे. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कविता व्यापक असा सामाजिक आशय व्यक्त करीत असल्याने या कवितेला वेगळे असे सामाजिक आणि वाङ्मयीन मूल्य प्राप्त झाले आहे.

**संदर्भ टीपा :—**


१. डॉ. यशवंत मनोहर, आंबेडकरवादी मराठी कविता, भीमरत्न प्रकाशन, नागपूर, १९९९, पृ. १९०
२. सुरेश साबळे ( संपा.), युगाचे हुंदके, संदेश प्रकाशन, बुलडाणा, १९९८, पृ. २२
३. उनि, डॉ. यशवंत मनोहर, पृ. १९१
४. तत्रैव, पृ. १९१
५. तत्रैव, पृ. १९१
६. उनि, सुरेश साबळे, पृ. ३५
७. तत्रैव, पृ. ५०
८. तत्रैव, पृ. ५९
९. तत्रैव, पृ. ४८
१०.तत्रैव, पृ. २९

११.डॉ. ऋषीकेश कांबळे, दलित कविता आणि अमेरिकन ब्लॅक पोएट्री, गोदा प्रकाशन, औरंगाबाद, २०१२, पृ. ३०६, ३०७
१२.तत्रैव, पृ. ४२
१३.उनि, सुरेश साबळे, ५४
१४.तत्रैव, पृ. ७